ePaper

# डोनाल्ड ट्रम्प यांची पुन्हा मोठी धमकी, म्हणाले, फक्त दोन आठवडे!



| वर्ष - 9 | अंक - 8 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

आतील पानांत

- टीम इंडियाच्या जर्सीमध्ये मोठे बदल!
- ऑस्ट्रेलियाचा घरच्या मैदानावर पराभव
- लॉर्ड स्वराज पॉल यांचे लंडनमध्ये निधन
- शिक्षणात महत्त्वाचा बदल!

www.mahaenews.com | शनिवार, दि. 23 ऑगस्ट 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## उपराष्ट्रपती पदाची निवडणूक तरुण उमेश म्हेत्रेचा उपराष्ट्रपतीपदासाठी धडाकेबाज प्रवेश

# महाराष्ट्रातून नवा उमेदवार चर्चेत!

### सहजपूरच्या तरुणाने दाखल केला उमेदवारी अर्ज, राजकीय वर्तुळात खळबळ

| पुणे | प्रतिनिधी | महाईन्यूज

**पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील सहजपूर गावचा तरुण उमेश म्हेत्रे याने भारताच्या उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करून सर्वत्र आश्चर्याचा धक्का दिला आहे. वयाने तरुण असलेल्या उमेशने नवी दिल्लीतील राज्यसभेच्या दालनात निवडणूक निर्णय अधिकारी पी.सी. मोदी आणि गिरीमा जैन यांच्याकडे उमेदवारी अर्ज सादर केला. उमेदवारीसाठी आवश्यक असलेले १५ हजार रुपयांचे डिपॉझिटही त्याने जमा केले आहे. उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी त्याने ही धाडसी पायरी उचलली, ज्यामुळे राजकीय आणि स्थानिक पातळीवर चर्चांना उधाण आले आहे.**

उमेश म्हेत्रे यांनी उपराष्ट्रपतीपदा सारख्या देशातील दुसऱ्या सर्वोच्च संवैधानिक पदासाठी अर्ज दाखल करून सामान्य तरुणांमधील आत्मविश्वास आणि ध्येयवादी वृत्तीचे दर्शन घडवले आहे. भारतीय संविधानानुसार, उपराष्ट्रपती पदासाठी उमेदवाराला किमान ३५ वर्षे वय आणि २० प्रस्तावक तसेच २० अनुमोदकांचा पाठिंबा आवश्यक आहे. उमेशने या सर्व अटींची पूर्तता केली असल्याचा दावा केला आहे. त्याच्या या निर्णयामुळे दौंड तालुक्यातील नागरिकांमध्ये अभिमानासोबतच आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

स्थानिक पातळीवर उमेशच्या या निर्णयाने तरुणांमध्ये नवे प्रेरणास्थान निर्माण केले आहे. राजकीय वर्तुळातही त्याच्या या धाडसाची चर्चा आहे, कारण अशा उच्च पदासाठी ग्रामीण भागातील तरुणाने पाऊल उचलणे ही दुर्मीळ बाब आहे.

उमेशच्या उमेदवारीमुळे सहजपूर गाव आणि दौंड तालुका राष्ट्रीय पातळीवर चर्चेत आले आहेत. आता निवडणूक आयोगाकडून उमेशच्या अर्जाची छाननी होईल, आणि त्याची उमेदवारी वैध ठरल्यास तो निवडणुकीत काय प्रभाव पाडतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. उमेशच्या या धाडसी पावलाने लोकशाहीतील सहभागाचे नवे उदाहरण घालून दिले आहे.



### सी पी राधाकृष्णन हे एनडीएचे उमेदवार

उपराष्ट्रपतीपदासाठी महाराष्ट्राचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन हे एनडीएचे उमेदवार आहेत. तर सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश सुदर्शन रेड्डी हे इंडिया आघाडीचे उमेदवार आहेत. येत्या 9 सप्टेंबरला या निवडणूकीचं मतदान पार पडणार आहे. माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी राजीनामा दिल्याने ही निवडणूक घेण्यात येत आहे.

# राज्यात महापालिकांच्या निवडणुकांना वेग!

## राज्यभर प्रारूप प्रभाग रचना जाहीर; 3 ते 4 सप्टेंबरपर्यंत हरकती व सूचना नोंदवण्याची मुदत

| पुणे | प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे महापालिका निवडणुकीसाठी प्रारूप प्रभाग रचना जाहीर झाली आहे. दिवाळीनंतर होणाऱ्या महापालिका निवडणुकीसाठी एकूण 41 प्रभाग असणार आहेत. यातील 40 प्रभाग चार सदस्यीय तर एक प्रभाग पाच सदस्यीय असणार आहे. यातून एकूण 165 नगरसेवक निवडले जाणार आहेत.**



सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार 2011 च्या जनगणनेनुसार ही प्रभागरचना जाहीर झाली आहे. यानुसार पुणे शहराची लोकसंख्या 34 लाख 81 हजार 359 इतकी आहे. याच्या आधारे ही प्रभाग रचना करण्यात आली आहे. 165 सदस्यांसाठी ही निवडणूक पार पडणार आहे. यासाठी 41 प्रभाग बनवण्यात आले आहेत. यातील प्रभाग क्रमांक 38 हा 5 सदस्यीय असून उर्वरित 40 प्रभाग 4 सदस्यीय असणार आहेत.

### आंबेगाव- कात्रज हा सर्वात मोठा प्रभाग

आंबेगाव- कात्रज हा लोकसंख्येनुसार सर्वात मोठा (1,14,970) आणि अप्पर सुपर इंदिरानगर हा सर्वात लहान (75,944) प्रभाग आहे. जाहीर प्रभागरचनेनुसार कळस- धानोरी हा पहिल्या क्रमांकाचा प्रभाग असणार आहे, महंमदवाडी- उंड्री हा शेवटटा म्हणजेच 41 नंबरचा प्रभाग असणार असणार आहे.

### नाशिक महानगरपालिकेची प्रभाग रचना

राज्य निवडणूक आयोगाचे निर्देशानुसार नाशिक महापालिका निवडणुकींसाठी चार सदस्य प्रारूप प्रभाग रचना जाहीर करण्यात आली आहे. 2011 च्या लोकसंख्येनुसार 122 सदस्य संख्या कायम असणार आहे. प्रभाग रचनेत कुठलाही बदल नाही. 29 प्रभाग चार सदस्यी तर 2 प्रभाग (15 आणि 19) हे तीन सदस्य असणार आहेत. या प्रभाग रचनेवर 4 सप्टेंबर पर्यंत हरकती व सूचना मांडता येणार आहेत.

## प्रभाग रचना जाहीर

## सदस्यांची संख्या १६४ वरून १६५ वर पोहोचली

# पुण्यात 41 प्रभाग; प्रारूप प्रभाग रचना जाहीर

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे महापालिकेच्या निवडणुकांसाठी प्रारूप प्रभाग रचना जाहीर झाली असून, २०१७ च्या निवडणुकीच्या तुलनेत यंदा प्रभागाची संख्या एकने कमी होऊन ४१ झाली आहे. सदस्यांची संख्या एकने वाढून १६४ वरून १६५ वर पोहोचली आहे. चार सदस्यांचे ४० आणि पाच सदस्यांचा एक प्रभाग असणार आहे. हरकती आणि सूचनांसाठी ४ सप्टेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे.**

## सूचनांसाठी ४ सप्टेंबरपर्यंत मुदत




तीन वर्षे रखडलेल्या निवडणूक प्रक्रियेला गती मिळाल्यानंतर आयुक्त नवल किशोर राम यांच्या हस्ते शुक्रवारी प्रारूप प्रभाग रचनेचा आराखडा प्रसिद्ध करण्यात आला. २०११ या वर्षाची लोकसंख्या गृहीत धरून प्रभागरचना करावी, अशा सूचना राज्य निवडणूक आयोगाने दिल्या होत्या. त्यानुसार महापालिकेने ३४ लाख ८१ हजार ३५९ लोकसंख्येनुसार प्रभागरचना केली आहे. यामध्ये अनुसूचित जातीची लोकसंख्या ४ लाख ६८ हजार, तर अनुसूचित जमातींची लोकसंख्या ४० हजार आहे. या लोकसंख्येच्या आधारे १६५ नगरसेवकांची रचना असणार आहेत.चार सदस्यांचे ४० आणि पाच सदस्यांचा एक असे ४१ प्रभाग निश्चित करण्यात आले आहेत, असे महापालिका आयुक्त तथा प्रशासक नवल किशोर राम यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. यावेळी अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., ओमप्रकाश दिवटे, एम. जे. चंद्रन, महापालिकेच्या निवडणूक विभागाचे उपायुक्त प्रसाद काटकर, नगरसचिव योगिता भोसले आदी उपस्थित होते.महापालिकेच्या निवडणूक कार्यालयाने निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनांचे पालन करून ही प्रभाग रचना तयार करून ती राज्य सरकारच्या नगरविकास विभागाकडे पाठविली होती. त्याची तपासणी करत नगरविकास विभागाने राज्य निवडणूक आयोगाकडे पाठविली होती. निवडणूक आयोगाने त्याची तपासणी करून ही प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्धीसाठी महापालिकेकडे पाठविल्याचे आयुक्त नवल किशोर राम यांनी स्पष्ट केले.प्रभाग रचना करताना चार सदस्यीय ४० प्रभागांतील लोकसंख्या ही सरासरी ८४ हजार ३९६ इतकी गृहीत धरली गेली, तर पाच सदस्यीय प्रभागातील लोकसंख्या ही कमीत कमी ९४ हजार आणि जास्तीत जास्त एक लाख १६ इतकी गृहीत धरण्याचे बंधन निवडणूक आयोगाने घातले होते. त्यानुसार ही प्रभाग रचना केल्याचा दावा महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी केला.महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या प्रारूप प्रभाग रचनेबाबत नागरिकांना त्यांच्या हरकती आणि सूचना नोंदविता येणार आहेत. येत्या ४ सप्टेंबर रोजी दुपारी तीन वाजेपर्यंत नागरिकांना हरकती नोंदविता येणार आहे. महापालिका मुख्य भवन, १५ क्षेत्रीय कार्यालये तसेच सावरकर भवन येथील महापालिकेच्या निवडणूक कार्यालय अशा तीन ठिकाणी या हरकती नोंदविता येणार आहेत. ४ सप्टेंबरनंतर महापालिकेकडे आलेल्या हरकतींची छाननी करून त्यावर सुनावणी घेतली जाणार असल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले.महापालिकेने जाहीर केलेल्या प्रभागांच्या रचनेत सर्वांत मोठा प्रभाग आंबेगाव-कात्रज (प्रभाग ३८) हा ठरला आहे. या प्रभागाची लोकसंख्या १ लाख १४ हजार ९७० इतकी आहे. तर सर्वांत लहान प्रभाग अपर सुपर इंदिरानगर हा (प्रभाग ३९) ठरला आहे. या प्रभागाची लोकसंख्या ७५ हजार ९४४ इतकी आहे.तीन वर्षे रखडलेल्या निवडणूक प्रक्रियेला गती मिळाल्यानंतर आयुक्त नवल किशोर राम यांच्या हस्ते शुक्रवारी प्रारूप प्रभाग रचनेचा आराखडा प्रसिद्ध करण्यात आला. २०११ या वर्षाची लोकसंख्या गृहीत धरून प्रभागरचना करावी, अशा सूचना राज्य निवडणूक आयोगाने दिल्या होत्या. त्यानुसार महापालिकेने ३४ लाख ८१ हजार ३५९ लोकसंख्येनुसार प्रभागरचना केली आहे. यामध्ये अनुसूचित जातीची लोकसंख्या ४ लाख ६८ हजार, तर अनुसूचित जमातींची लोकसंख्या ४० हजार आहे.

### लोकसंख्येच्या आधारे रचना


चार सदस्यांचे ४० आणि पाच सदस्यांचा एक असे ४१ प्रभाग निश्चित करण्यात आले आहेत, असे महापालिका आयुक्त तथा प्रशासक नवल किशोर राम यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. यावेळी अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., ओमप्रकाश दिवटे, एम. जे. चंद्रन, महापालिकेच्या निवडणूक विभागाचे उपायुक्त प्रसाद काटकर, नगरसचिव योगिता भोसले आदी उपस्थित होते.

# रामायणावर आधारित अभ्यासक्रम सुरू करा

## भाजपचे माजी खासदार डॉ. विनय सहस्रबुद्धे यांची मागणी

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाने दिलेल्या लवचिकतेचा वापर करून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने रामायणावर आधारित एक-दोन क्रेडिटचे अभ्यासक्रम सुरू करावेत. तसेच आपला वारसा विद्यार्थ्यांना माहीत होण्यासाठी विज्ञान-तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठीही अशा प्रकारचे अभ्यासक्रम सुरू करायला हवेत.' अशी सूचना भाजपचे माजी खासदार डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी केली.**



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा आरोग्यशास्त्र विभाग आणि मिहाना पब्लिकेशन्स यांच्या वतीने डॉ. सहस्रबुद्धे यांच्या हस्ते 'रामायण – भारतीय सभ्यतेचा आत्मा' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

त्या वेळी ते बोलत होते. निवृत्त सनदी अधिकारी लीना मेहेंदळे, 'आयुष'चे राष्ट्रीय संशोधन प्राध्यापक डॉ. भूषण पटवर्धन, विद्यापीठाच्या प्रभारी कुलसचिव ज्योती भाकरे, लेखक रामचंद्र मुटाटकर, प्रकाशक अमृता कुलकर्णी या वेळी उपस्थित होते.सहस्रबुद्धे म्हणाले, 'विद्यार्थ्यांना आपला वारसा माहीत होण्यासाठी रामायणावर आधारित अभ्यासक्रम सुरू करणे आवश्यक आहे. त्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात; तसेच विज्ञान-तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनासाठी रामायणावर आधारित अभ्यासक्रम सुरू करायला हवेत,मात्र, रामायण हे भारतीय जीवनात-संस्कृतीशी एकरूप झालेले दिसते. देशाच्या वेगवेगळ्या भागात तेथील स्थानिक संस्कृतीवर रामायणाचा प्रभाव दिसतो. रामायण हा खऱ्या अर्थाने भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे.' असेही सहस्रबुद्धे म्हणाले.

### 'रामायण अनेक देशांना जोडते

'रामायण हे अनेक देशांना जोडते. आशिया-अफ्रिका खंडातील वेगवेगळ्या देशांत रामायणातले संदर्भ सापडतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितल्याप्रमाणे सांस्कृतिक धाग्याने जोडलेल्या देशांची संघटना स्थापन करायची असेल, तर रामायण-महाभारताचा उपयोग करता येऊ शकतो,' असेही सहस्रबुद्धे यांनी सांगितले.


## मासुळकर कॉलनी सर्वाधिक तर गवळीनगर, चक्रपाणी वसाहत ठरला सर्वात कमी लोकसंख्येचा मतदार संघ

# पिंपरी महापालिकेची प्रारूप प्रभाग रचना जाहीर!

### ३२ प्रभागांतून निवडले जाणार १२८ नगरसेवक

। पिंपरी चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी प्रारूप प्रभाग रचना अखेर (२२ ऑगस्ट) जाहीर करण्यात आली. या प्रारूप रचनेनुसार प्रभाग क्रमांक ९ (मासुळकर कॉलनी, खराळवाडी परिसर) हा सर्वाधिक लोकसंख्येचा असून याठिकाणी ५९,३९० लोकसंख्या आहे. दुसरीकडे प्रभाग क्रमांक ५ (गवळीनगर, चक्रपाणी वसाहत) हा सर्वात कमी लोकसंख्येचा प्रभाग असून येथे ४९,०४९ लोकसंख्या नोंदवली गेली आहे.**




पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी प्रारूप प्रभाग रचना अखेर शुक्रवारी (२२ ऑगस्ट) जाहीर करण्यात आली. नव्या रचनेनुसार शहरात एकूण ३२ प्रभाग असून प्रत्येक प्रभागातून चार नगरसेवक निवडले जाणार आहेत. यानुसार एकूण १२८ नगरसेवक महापालिकेत निवडून येणार आहेत.

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, या प्रारूप रचनेवर ४ सप्टेंबर २०२५ पर्यंत नागरिक व इच्छुक उमेदवारांकडून हरकती व सूचना मागवण्यात येणार आहेत. यानंतर ५ ते १२ सप्टेंबर दरम्यान सुनावणी होणार आहे. त्यानंतर सुधारित रचना १३ ते १५ सप्टेंबर दरम्यान नगरविकास विभागाकडे सादर केली जाईल. अंतिम मंजुरीनंतर महापालिका आयुक्तांकडून अंतिम प्रभाग रचना घोषित केली जाईल.

**तळवडे-चिखली भागातून प्रभाग रचना सुरू**

महापालिकेच्या २०१७ मधील निवडणुकीप्रमाणेच यंदाही चार सदस्यीय प्रभाग पद्धत कायम ठेवण्यात आली आहे. २०११ च्या जनगणनेतील १७,२७,६९२ लोकसंख्या या आधारे प्रभाग रचना करण्यात आली आहे. यावेळी तळवडे-चिखली भागातून प्रभाग रचना सुरू करण्यात आली असून सांगवी-दापोडी भागापर्यंत उतरत्या क्रमाने प्रभाग आखण्यात आले आहेत. गुगल अर्थ मॅपचा वापर करून आणि स्थळ पाहणी करूनच अंतिम नकाशे तयार करण्यात आले.

### आरक्षणानुसार जागा

महिला व पुरुष प्रत्येकी- ६४ जागा
* अनुसूचित जाती (SC) – २० जागा
* अनुसूचित जमाती (ST) –३ जागा
* इतर मागासवर्गीय (OBC) – ३५ जागा
* खुला प्रवर्ग – ७० जागा

राखीव असणार आहेत.

“ या रचनेची नकाशे महापालिका मुख्यालय, क्षेत्रीय कार्यालये व महापालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. **-शेखर सिंह,** आयुक्त

“ १ जुलै २०२५ पर्यंतची राज्य निवडणूक आयोगाने जारी केलेली मतदार यादी ग्राह्य धरली जाणार आहे. त्यानुसार सध्या शहरात १७ लाख ७५१ मतदार आहेत. **-अविनाश शिंदे,** सहायक आयुक्त

# अन्नधान्य अधिकारी कार्यालयासाठी पाठपुरावा!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मागणी; भाजपा आमदार महेश लांडगे यांचे निवेदन

। पिंपरी-चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात स्वतंत्र अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालय स्थापन करण्याची मागणी भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. सद्यस्थितीत नागरिकांना व रास्तभाव दुकानदारांना अन्नधान्य वितरणाशी संबंधित कामांसाठी थेट पुणे कार्यालयात जावे लागते. यामुळे त्यांचा वेळ, पैसा आणि श्रम वाया जात आहेत, असे लांडगे यांनी नमूद केले आहे.**





पिंपरी-चिंचवडसह देहू कॅन्टोनमेन्ट, देहू नगरपंचायत व काही भागांतील एकूण लोकसंख्या ३० लाखांच्या घरात असून, भोसरी, चाकण, तळेगाव, हिंजवडीसारख्या औद्योगिक पट्ट्यांमुळे स्थलांतरितांची संख्या झपाट्याने वाढत आहे. अशा वेळी, फक्त तीन परिमंडळ अन्नधान्य कार्यालयांवर कामकाजाचा वाढता भार पडत असल्याने नागरिक व दुकान चालकांना पुण्यात जावे लागते. त्यात वेळेचा अपव्यय होतो, असेही आमदार लांडगे यांनी नमूद केले.

सोलापूरसारख्या शहरात केवळ ११ लाख लोकसंख्येसाठी स्वतंत्र अन्नधान्य कार्यालय कार्यरत आहे, याची उदाहरणासह तुलना देत लांडगे यांनी पिंपरी-चिंचवडसारख्या वाढत्या लोकसंख्येच्या शहरात स्वतंत्र कार्यालयाची गरज अधोरेखित केली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या मागणीची गंभीर दखल घ्यावी व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात स्वतंत्र अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालय तातडीने सुरू करावे, अशी विनंती आमदार लांडगे यांनी आपल्या पत्रात केली आहे.

“ पिंपरी-चिंचवडसारख्या ३० लाख लोकसंख्येच्या औद्योगिक आणि वेगाने वाढणाऱ्या शहरात अन्नधान्य वितरणासाठी स्वतंत्र अधिकारी कार्यालय असणे ही काळाची गरज आहे. नागरिक आणि रास्तभाव दुकानदारांना पुण्यात धावपळ करण्यापेक्षा स्थानिक स्तरावरच सेवा उपलब्ध झाल्यास कार्यक्षमता वाढेल आणि जनतेचे हाल टळतील.” **-- महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

स्वतंत्र कार्यालय स्थापन झाल्यास होणारे फायदे:
1. सामान्य नागरिकांच्या अडचणी दूर होतील.
2. रास्तभाव दुकानदारांचे कामकाज अधिक सुलभ होईल.
3. शासकीय कर्मचाऱ्यांचा वेळ आणि श्रम वाचेल.
4. शासकीय कामकाजात गतिमानता येईल.
5. लोकप्रतिनिधींना नागरिकांच्या समस्या तात्काळ मार्गी लावता येतील.

## कळकळीचे नामस्मरण »



आम्ही सुस्थितीत असलो म्हणजे आमचे नामस्मरण अधिक होते. त्यात काही बिघाड झाला की तिकडेच सारे लक्ष वेधते. याला कारण म्हणजे आमचे स्मरण हे वरवरचे असते. श्रद्धेने नामस्मरण करणे आपल्याला कठीण जाते. परमात्म्याशिवाय आपले कोणी नाही असा दृढ निश्चय अगर श्रद्धा असणे आवश्यक आहे. म्हणजे मग प्रकृतीत काही बिघाड झाला तरी आपले स्मरण टिकून राहील. द्रौपदीला आता आपला कोणी त्राता नाही असे वाटून जेव्हा तिने श्रीकृष्णाचा धावा केला, तेव्हा भगवान् लगेच धावून आले. असे खऱ्या कळकळीचे स्मरण आपले असायला पाहिजे. जसे लहान मूल काहीही झाले तरी आपल्या आईलाच हाक मारते, दुसरे तिसरे कोणी जाणत नाही, तसे आपले परमेश्वर-स्मरणाच्या बाबतीत झाले पाहिजे. आपली भिस्त खरोखर कोणावर आहे हे संकटकाळीच उत्तम कळते. नामस्मरणाच्या पायऱ्या अशा सांगता येतील - पहिली, सुस्थितीतले वरवरचे स्मरण; दुसरी, परमात्म्याशिवाय आपले कोणी नाही ही जाणीव होऊन, संकटसमयी त्याचे स्मरण; आणि तिसरी, हीच जाणीव दृढ होऊन पुढे अखंड होणारे नामस्मरण. यांपैकी वरवर स्मरण करणारा 'आम्हांला संकटेच नकोत' असे म्हणतो, तर साधुसंत 'आम्हांला संकटे येऊ देत' असे भगवंताजवळ मागतात, कारण त्यावेळेसच त्याचे खरे स्मरण होते. आपण स्वतः आहोत याची आपल्याला आज जितकी खात्री आहे, तितकी खात्री भगवंत आहे अशी झाली पाहिजे. परमात्मा सर्व ठिकाणी आहे की कल्पना केव्हा तरी आपल्याला होते खरी, पण ती कायम न राहिल्यामुळे दृढपणे आपल्या आचरणात येत नाही; आपली वृत्ती तशी झाली की ती आपल्या आचरणात येईल. भगवंत हा कर्ता आहे अशी आपली दृढ भावना झाली की आपण प्रत्येक गोष्ट त्याला सांगत बसणार नाही, 'भगवंताला माझे सर्व कळते' असे जर खरेच वाटले तर त्याला आवडेल असेच आपण वागू. पहाटे उठावे आणि भगवंताची मूर्ती डोळ्यांसमोर आणून प्रार्थना करावी, आणि "तुझे विस्मरण जिथे होते, तिथे मला जागृत करीत जावे; नाही मला आता तुझ्याशिवाय आसरा," असे म्हणून त्याला मनःपूर्वक नमस्कार करावा. मनुष्य कसाही असला तरी भगवंताच्या स्मरणात त्याला समाधान खात्रीने मिळेल. जो भगवंताचा झाला त्याला जगण्याचा कंटाळा कधीच येणार नाही. विषयाचा आनंद हा दारूसारखा आहे; ती धुंदी उतरल्यावर मनुष्य जास्त दुःखी बनतो. 'मी भगवंताचा आहे' या भावनेने जो राहील त्यालाच खरा आनंद भोगता येईल.



## 'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# तत्त्वनिष्ठेची परीक्षा की संख्याबळाचा खेळ?

**देशाच्या सर्वोच्च घटनात्मक पदांपैकी एक असलेल्या उपराष्ट्रपतीपदासाठी सुरु असलेल्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वर्तुळात घडणाऱ्या हालचालींनी नवा रंग घेतला आहे. एकीकडे एनडीए कडून झारखंडचे माजी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना उमेदवारी देण्यात आली आहे, तर दुसरीकडे इंडिया आघाडी कडून बी. सुदर्शन रेड्डी यांना उमेदवार म्हणून उभं करण्यात आलं आहे. या निवडणुकीत केवळ संख्याबळाचा खेळ दिसतोय की विचारधारेवर आधारित राजकारणाची चुणूक – हा प्रश्न आज निर्माण झाला आहे.**



### फडणवीस आणि पवार संवाद – केवळ शिष्टाचार की दबावराजकारण?

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांना फोन करून सी. पी. राधाकृष्णन यांना पाठिंबा देण्याची विनंती केली, ही घटना महत्त्वाची आहे. एका बाजूला ही शिष्टाचाराची राजकीय पद्धत मानली जाऊ शकते, पण दुसरीकडे या मागे एक प्रकारचा राजकीय दबाव, किंवा विरोधकांमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न आहे का, हा प्रश्न उपस्थित होतो.

शरद पवारांनी अत्यंत स्पष्ट शब्दांत उत्तर देत म्हटलं की, "राधाकृष्णन आमच्या विचारांचे नाहीत. आम्ही आमच्याच उमेदवारास पाठिंबा देऊ." त्यांनी हेही स्पष्ट केलं की, "आमच्याकडे मतं कमी आहेत, पण आम्ही आमचं तत्त्व सोडणार नाही." ही भूमिका आजच्या राजकारणात विरळा असलेला तत्त्वनिष्ठ राजकीय दृष्टिकोन दर्शवते.

### उमेदवारांची पार्श्वभूमी – केवळ पात्रता पुरेशी आहे का?

सी. पी. राधाकृष्णन हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारधारेशी निष्ठावान राहिलेले आहेत. त्यांनी झारखंडचे राज्यपाल म्हणून कार्यभार सांभाळला होता आणि त्या काळात झारखंडचे मुख्यमंत्री अटक प्रकरणात त्यांचं नाव चर्चेत आलं होतं. बी. सुदर्शन रेड्डी हे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते असून लोकसभेचे माजी खासदार आहेत. भारत जोडो योजनेसह अनेक सामाजिक विषयांवर त्यांची सक्रिय भूमिका राहिली आहे. उपराष्ट्रपती हे पद राज्यसभेच्या सभापतीच्या जबाबदारीसह अनेक संवैधानिक भूमिका पार पाडतं. त्यामुळे या पदासाठी उमेदवारांची फक्त राजकीय निष्ठा नव्हे, तर लोकशाही मूल्यांवरील आस्था, राज्यघटनेची समज, आणि सर्वपक्षीय समन्वय क्षमताही महत्त्वाची ठरते.

### इंडिया आघाडीची भूमिका – मतांची कमतरता असूनही स्पष्ट भूमिका

शरद पवारांनी हे मान्य केलं आहे की इंडिया आघाडीच्या उमेदवाराकडे आवश्यक संख्याबळ नाही. तरीही ते म्हणतात की, "मतं कमी असली तरी आमचं म्हणणं स्पष्ट आहे – आम्ही आपले विचार सोडणार नाही." ही भूमिका आजच्या 'सत्तामुखी' राजकारणात सिद्धांतनिष्ठतेचं उदाहरण आहे. केवळ संभाव्य विजयी उमेदवारालाच पाठिंबा देणं हे व्यवहार्य राजकारण मानलं जातं. पण तसं न करता, आपली विचारधारा आणि मूल्यसंस्था जपणं ही लोकशाहीला बळकट करणारी बाब आहे.

### बिहारचा राजकीय संदर्भ – निवडणूक आयोगावर प्रश्नचिन्ह

शरद पवारांनी या पत्रकार परिषदेत बिहारमधील 'मतदार अधिकार यात्रा' आणि निवडणूक आयोगाच्या भूमिकेबाबतही भाष्य केलं. राहुल गांधींच्या यात्रेला लोकांचा मोठा प्रतिसाद मिळतोय, आणि याच वेळी निवडणूक आयोगाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. पवार म्हणतात, "निवडणूक आयोग आपलं काम योग्य प्रकारे करत नाही, मतदार यादीबाबत अभ्यास सुरू आहे." हे विधान केवळ निवडणुकीच्या पारदर्शकतेबाबत चिंता व्यक्त करत नाही, तर लोकशाही प्रक्रियेच्या सुदृढतेवर लक्ष वेधतं.

### देशाच्या राजकारणात तत्त्वांची गमावलेली जागा पुन्हा शोधण्याची वेळ

आजचं राजकारण संख्याबळ, प्रतिमा व्यवस्थापन, आणि प्रचारतंत्र यांच्याभोवती फिरतंय. अशा वेळी, "आपल्याकडे बहुमत नाही, पण आमची भूमिका ताठ आहे" असं म्हणणं ही गोष्ट दुर्मीळ ठरते. या निवडणुकीच्या निमित्ताने पक्ष आणि नेते एक गोष्ट लक्षात घेत आहेत का? सत्ता कायमस्वरूपी नाही, पण तत्त्वांवर आधारित भूमिका दीर्घकालीन प्रभाव निर्माण करू शकते.

### ही निवडणूक – एका व्यक्तीची नाही, विचारधारेची लढत

उपराष्ट्रपतीपदासाठीची ही निवडणूक दोन पक्षीय नव्हे, तर दोन राजकीय दृष्टिकोनांमधली लढत आहे. एका बाजूला संख्याबळाच्या जोरावर विजय मिळवण्याचा प्रयत्न, तर दुसऱ्या बाजूला लोकशाही मूल्यांची आणि विचारधारेची ठाम भूमिका – हा संघर्ष आपल्या लोकशाहीसाठी आरसा ठरतो. निवडणुका संपतात, पण त्या वेळेस घेतलेल्या भूमिका आणि निर्णय इतिहास घडवतात. या पार्श्वभूमीवर प्रत्येक पक्षाला आत्मपरीक्षण करावं लागेल – आपण केवळ सत्ता मिळवण्यासाठी राजकारण करत आहोत की लोकशाही टिकवण्यासाठीही काही करत आहोत?

**बोधवचन: भोग व दुःख यांत केवळ भगवंताकडे लक्ष दिले पाहिजे**

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र ... संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी ... या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव. (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

शिक्षणात बदल

## विश्लेषण कृतीला प्राधान्य देणारी पाठ्यपुस्तके तयार

# शिक्षणात महत्त्वाचा बदल!

## बालभारतीची पुस्तके दर्जेदार

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुलांनी जेवताना कार्टून, मोबाइलऐवजी बालभारतीची पुस्तके पाहिली पाहिजेत इतकी पाठ्यपुस्तके दर्जेदार असावीत, अशी अपेक्षा व्यक्त करून शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी आता शालेय शिक्षणात सोप्याकडून कठीणकडे असे सूत्र स्वीकारण्यात आल्याचे स्पष्ट केले.महाराष्ट्र पाठ्यपुस्तक निर्मिती आणि अभ्यासक्रम संशोधन मंडळातर्फे (बालभारती) आयोजित पाठ्यपुस्तक निर्मिती उद्बोधन वर्गाच्या उद्घाटनावेळी भुसे बोलत होते.**



शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार, प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर, योजना संचालक डॉ. कृष्णकुमार पाटील, माध्यमिक संचालक डॉ. महेश पालकर, बालभारतीच्या संचालक डॉ. अनुराधा ओक, सुकाणू समिती सदस्य डॉ. श्रीपाद ढेकणे या वेळी उपस्थित होते.भुसे म्हणाले, 'मोबाइल, दूरचित्रवाणी, कृत्रिम बुद्धिमत्ता अशा आव्हानांना सामोरे जाताना मातीशी नाळ तुटते आहे का, संस्कृतीपासून अंतर पडते आहे का, याचा विचार करण्याची गरज आहे. हल्लीच्या काळात मुले, पालक मोबाइलमध्ये असतात. मुलांनी जेवताना कार्टून, मोबाइलऐवजी बालभारतीची पाठ्यपुस्तके पाहिली पाहिजेत.

'"राष्ट्र प्रथम' ही संकल्पना शिक्षण विभागाने घेतली आहे. त्यानुसार शिक्षण हे भाकरीची, राष्ट्रीयत्त्व देण्याची जबाबदारी आहे. विद्यार्थी स्वतःच्या पायावर उभे राहून, चरितार्थाचे साधन निर्माण करून घराची चूल पेटवू शकले पाहिजेत.

राष्ट्रीय विचारांचे नागरिक म्हणून घडले पाहिजेत. त्यामुळे पाठ्यपुस्तकांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांसह महान व्यक्तिमत्त्वे, द्यावी, असे देओल यांनी सांगिले. तर, राज्याची पाठ्यपुस्तके देशात सर्वोत्कृष्ट ठरतील, असा विश्वास सचिंद्र प्रताप सिंह यांनी व्यक्त केला. रेखावार, डॉ. ओक यांनीही मनोगत व्यक्त केले.शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार, प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर, योजना संचालक डॉ. कृष्णकुमार पाटील, माध्यमिक संचालक डॉ. महेश पालकर, बालभारतीच्या संचालक डॉ. अनुराधा ओक, सुकाणू समिती सदस्य डॉ. श्रीपाद ढेकणे या वेळी उपस्थित होते.भुसे म्हणाले, 'मोबाइल, दूरचित्रवाणी, कृत्रिम बुद्धिमत्ता अशा आव्हानांना सामोरे जाताना मातीशी नाळ तुटते आहे का, संस्कृतीपासून अंतर पडते आहे का, याचा विचार करण्याची गरज आहे. हल्लीच्या काळात मुले, पालक मोबाइलमध्ये असतात. मुलांनी जेवताना कार्टून, मोबाइलऐवजी बालभारतीची पाठ्यपुस्तके पाहिली पाहिजेत.'"राष्ट्र प्रथम' ही संकल्पना शिक्षण विभागाने घेतली आहे. त्यानुसार शिक्षण हे भाकरीची, राष्ट्रीयत्त्व देण्याची जबाबदारी आहे.

### राष्ट्र प्रथम' ही संकल्पना

राष्ट्रीय विचारांचे नागरिक म्हणून घडले पाहिजेत. त्यामुळे पाठ्यपुस्तकांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांसह महान व्यक्तिमत्त्वे, क्रांतिकारक, समाजसुधारक, राज्यघटना, शेती, पर्यावरण, वाहतूक नियम, स्वच्छता, व्यसनमुक्त, संरक्षण, परराष्ट्र धोरण, दळणवळण, खनिज संपत्ती अशा घटकांचाही पाठ्यपुस्तकात इयत्तेनुसार समावेश असावा,' असे ते म्हणाले.

# पत्ते खेळण्याचे कुटाणे केले कशाला?

## कोकाटेंनी मानहानीची नोटीस पाठवताच पवारांचा संतप्त सवाल

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते तथा मंत्री माणिकराव कोकाटे मंत्री झाल्यापासून अनेकदा वादात अडकले आहेत. अनेकदा त्यांच्या वादग्रस्त विधानामुळे राजकीय वादही झाल्याचं पाहायला मिळालं. एवढंच नाही तर विधिमंडळाच्या सभागृहात मोबाइलवर गेम खेळतानाचा त्यांचा एक व्हिडीओ रोहित पवारांनी एक्सवर (ट्विटर) शेअर केला होता. त्यानंतर मंत्री कोकाटे यांच्यावर टीकेची झोड उठली होती.**





त्यानंतर अखेर त्यांच्याकडून कृषी खात्याचा कार्यभार काढून घेण्यात आला आणि क्रीडा आणि युवक कल्याण खात्याची जबाबदारी त्यांच्याकडे देण्यात आली. दरम्यान, आमदार रोहित पवार यांनी मंत्री कोकाटे यांचा रमी खेळतानाचा व्हिडीओ एक्सवर शेअर केला होता. या प्रकरणी रोहित पवार यांना मंत्री माणिकराव कोकाटे यांनी मानहानीच्या दाव्याची नोटीस पाठवल्याची माहिती समोर आली आहे. या संदर्भातील माहिती रोहित पवार यांनी एक्सवर एक पोस्ट शेअर करत दिली आहे. तसेच रोहित पवार यांनी यावरून मंत्री कोकाटेंवर जोरदार टीका करत मानहानीची एवढी काळजी होती तर पत्ते खेळण्याचे कुटाणे केलेच कशाला? असा सवाल केला आहे."माजी कृषिमंत्र्यांचा सभागृहात पत्ते खेळतानाचा व्हिडीओ जगजाहीर केला म्हणून मला मानहानीच्या दाव्याची नोटीस आलीय. मानहानीची एवढी काळजी होती तर पत्ते खेळण्याचे कुटाणे केलेच कशाला? शेतकऱ्यांप्रती असलेला आपला कळवळा आणि आपण केलेले पराक्रम सांगण्याची वेगळी गरज नाही. तुम्ही पाठवलेली नोटीस मजेशीर आहे.

### राहित पवार काय म्हणाले?

नोटीस वाचून हसू आवरता आले नाही. पण लक्षात ठेवा, पुराव्याशिवाय मी बोलत नाही. "जंगली_रमी_पे_आओ_ना_महाराज...!" सत्तेतल्या राष्ट्रवादी गटाला भाजपला विचारल्याशिवाय काहीच करता येत नाही म्हणूनच शेतीचे असंख्य प्रश्न प्रलंबित असताना, राज्यात रोज ८ शेतकरी आत्महत्या करत असताना सुद्धा काही कामच नसल्याने मंत्र्यांवर रमी खेळण्याची वेळ येत असावी.

## लॉर्ड स्वराज पॉलांना श्रद्धांजली

## पंतप्रधान मोदींसह विविध नेत्यांची श्रद्धांजली

# लॉर्ड स्वराज पॉल यांचे लंडनमध्ये निधन

।नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**प्रसिद्ध उद्योगपती आणि अनिवासी भारतीय लॉर्ड स्वराज पॉल (९४) यांचे लंडनमध्ये गुरुवारी निधन झाले. यशस्वी उद्योजक आणि परोपकारी वृत्तीचे म्हणून त्यांची ओळख होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. दरवर्षी करण्यात येणाऱ्या 'संडे टाइम्स रिच लिस्ट'मध्ये त्यांची संपत्ती २ अब्ज पौंडांची होती. ब्रिटनमध्ये ८१ वे श्रीमंत व्यक्ती होते.**

## स्वराज पॉल यांचे ९४ वर्षी निधन




लॉर्ड स्वराज पॉल यांनी ब्रिटनमधील 'कपारो ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज'ची स्थापना केली होती. काही दिवसांपूर्वी अस्वस्थ वाटू लागल्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथे त्यांची प्राणज्योत मालवली. 'पॉल यांच्या निधनामुळे खूप दु:ख झाले. उद्योग, परोपकार, ब्रिटनमधील सार्वजनिक सेवा आणि भारताबरोबर उत्तम संबंध प्रस्थापित करण्यासाठीचे त्यांचे योगदान कायमच लक्षात राहील,' अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी श्रद्धांजली अर्पण केली.स्वराज ब्रिटनच्या वरिष्ठ सभागृहाचे सदस्य होते. प्रकृती ठीक नसली, तरी ते नियमित सभागृहात जात असत. त्यांच्या निधनानंतर वरिष्ठ सभागृहानेही त्यांना श्रद्धांजली वाहिली.त्यांच्या कपारो उद्योगसमूहाचे मुख्यालय लंडनमध्ये होते. जगभरात ४० ठिकाणांहून त्यांचा व्यवसाय चाले. ब्रिटनसह, अमेरिका, भारत, पश्चिम आशियामध्ये त्यांच्या व्यवसायाचा विस्तार आहे. पुत्र आकाश पॉल हे 'कपारो इंडिया'चे अध्यक्ष आणि 'कपारो ग्रुप'चे संचालक आहेत. गेल्या वर्षी आकाश यांना वूल्व्हरहॅम्प्टन विद्यापीठाने स्वराज पॉल यांच्या हस्ते उद्योगविश्वातील कामगिरीसाठी मानद डॉक्टर पदवी बहाल केली.पॉल यांचा जन्म १८ फेब्रुवारी १९३१ रोजी झाला. त्यांचे वडील प्यारे लाल यांचा स्टीलची भांडी बनविण्याचा छोटा उद्योग होता. छोट्या बादल्यांसह शेतीची अवजारेही ते बनवत. घरातील वातावरणामुळे उद्योग जगताशी त्यांचा लहान वयातच परिचय झाला. जालंधरमधून त्यांनी शालेय शिक्षण घेतले. तर, पंजाब विद्यापीठातून १९४९ मध्ये ते पदवीधर झाले. त्यानंतर ते अमेरिकेत गेले. तेथे त्यांनी मेकॅनिकल इंजिनीअरिंगमध्ये पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेतले.

शिक्षण घेतल्यानंतर उद्योग सांभाळण्यासाठी ते पुन्हा भारतात आले.अपीजय सुरेंद्र ग्रुप' हे त्यांच्या भारतातील उद्योगाचे नाव होते. १९६६ मध्ये त्यांची मुलगी अंबिकावरील उपचारांसाठी ते ब्रिटनला गेले. तेथेच ते स्थायिक झाले. त्यांच्या मुलीचा वयाच्या चौथ्या वर्षी ल्युकेमियाने मृत्यू झाला. पॉल यांनी 'अंबिका पॉल फाउंडेशन' या परोपकारी संस्थेची नंतर स्थापना केली. लहान मुले आणि तरुणांचे स्वास्थ्य उत्तम राहावे, यासाठी ही संस्था शिक्षण आणि आरोग्य उपक्रमांच्या माध्यमातून काम करीत असे. लंडनमधील 'अंबिका पॉल चिल्ड्रन्स झू'ची स्थापना नंतर झाली. २०१५ मध्ये त्यांचा मुलगा अंगद आणि २०२२ मध्ये त्यांची पत्नी अरुणा यांचे निधन झाले. फेब्रुवारी २०२३ मध्ये लंडनमध्ये पत्नीच्या स्मरणार्थ त्यांनी 'लेडी अरुणा स्वराज पॉल हॉल'ची उभारणी केली.भारत-ब्रिटनमधील संबंध चांगले राहावेत, यासाठी पॉल यांनी इंडो-ब्रिटिश असोसिएशनची १९७५ मध्ये स्थापना केली. १९७८ मध्ये त्यांचा ब्रिटिश राणीने गौरव केला. नंतर ते ब्रिटनच्या वरिष्ठ सभागृहाचे सदस्य झाले. १९८३ मध्ये त्यांना भारत सरकारने पद्मभूषण हा नागरी सन्मान बहाल केला.लॉर्ड स्वराज पॉल यांनी ब्रिटनमधील 'कपारो ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज'ची स्थापना केली होती. काही दिवसांपूर्वी अस्वस्थ वाटू लागल्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. ब्रिटनमधील सार्वजनिक सेवा आणि भारताबरोबर उत्तम संबंध प्रस्थापित करण्यासाठीचे त्यांचे योगदान कायमच लक्षात राहील,' अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

### ब्रिटनमध्ये ८१ वे श्रीमंत व्यक्ती

स्वराज ब्रिटनच्या वरिष्ठ सभागृहाचे सदस्य होते. प्रकृती ठीक नसली, तरी ते नियमित सभागृहात जात असत. त्यांच्या निधनानंतर वरिष्ठ सभागृहानेही त्यांना श्रद्धांजली वाहिली.त्यांच्या कपारो उद्योगसमूहाचे मुख्यालय लंडनमध्ये होते. जगभरात ४० ठिकाणांहून त्यांचा व्यवसाय चाले. ब्रिटनसह, अमेरिका, भारत, पश्चिम आशियामध्ये त्यांच्या व्यवसायाचा विस्तार आहे.

# अटी मान्य करा, अन्यथा गाझा उद्ध्वस्त!

## इस्रायलने गाझातील 75 टक्के भागावर कब्जा केला

।नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**'हमास'ने अटी मान्य न केल्यास गाझा शहर उद्ध्वस्त होईल, असा इशारा इस्रायलच्या संरक्षणमंत्र्यांनी शुक्रवारी दिला. इस्रायलने गाझातील ७५ टक्के भागावर कब्जा केला असून, या भागात हल्ल्याची तयारीही केली जात आहे.इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी गाझा शहर ताब्यात घेण्यासाठी लष्कराला मोठी कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.**



यानंतर दुसऱ्याच दिवशी संरक्षणमंत्री इस्रायल काट्झ यांनी इशारा दिला की, गाझा हे सर्वात मोठे शहर रफाह आणि बेत हानूनमध्ये बदलू शकते, जे युद्धाच्या सुरुवातीला उद्ध्वस्त झाले आहे. युद्ध संपवण्यासाठी इस्रायलच्या अटी मान्य न करणाऱ्या गाझामधील हमासच्या सदस्यांसाठी नरकाचे दरवाजे लवकरच उघडतील, असे काट्झ यांनी समाजमाध्यमात म्हटले आहे. सर्व ओलिसांची सुटका आणि हमासचे संपूर्ण नि:शस्त्रीकरण, या युद्धबंदीच्या मागण्यांची इस्रायलने हमासला पुन्हा आठवण करून दिली. परंतु हमासने युद्ध संपवण्याच्या बदल्यात बंदिवानांची सुटका करणार असल्याचे म्हटले आहे, तसेच पॅलेस्टिनी राज्य निर्माण केल्याशिवाय नि:शस्त्रीकरण करणार नाही, असा निर्धारही केला आहे. दरम्यान, इस्रायलच्या आक्रमक पवित्र्याने गाझा शहरात येत्या काही दिवसांत व्यापक कारवाई सुरू होण्याची शक्यता आहे. 'हमास'ने अटी मान्य न केल्यास गाझा शहर उद्ध्वस्त होईल, असा इशारा इस्रायलच्या संरक्षणमंत्र्यांनी शुक्रवारी दिला. इस्रायलने गाझातील ७५ टक्के भागावर कब्जा केला असून, या भागात हल्ल्याची तयारीही केली जात आहे.

### हमासच्या नरकाचे दरवाजे उघडतील


इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी गाझा शहर ताब्यात घेण्यासाठी लष्कराला मोठी कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. गाझा हे सर्वात मोठे शहर रफाह आणि बेत हानूनमध्ये बदलू शकते, जे युद्धाच्या सुरुवातीला उद्ध्वस्त झाले आहे. युद्ध संपवण्यासाठी इस्रायलच्या अटी मान्य न करणाऱ्या गाझामधील हमासच्या सदस्यांसाठी नरकाचे दरवाजे उघडतील.

# श्रेया घोषालच्या लग्नातील फोटो पाहिलेत का?



बॉलीवूडमधील प्रसिद्ध गायिका श्रेया घोषाल कायम तिच्या गाण्यांमुळे चर्चेत असते. विविध चित्रपटांसाठी तिने गायलेली अनेक गाणी सुपरहिट झाली आहेत. श्रेयाचा आज लग्नाचा वाढदिवस आहे. ५ फेब्रुवारी २०१५ रोजी तिने शिलादित्य मुखोपाध्यायबरोबर लग्न केलं. या दोघांच्या लग्नाला आता १० वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यानिमित्त श्रेयाने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे.पतीला लग्नाच्या दहाव्या वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना श्रेयाने सोशल मीडियावर तिचे आणि तिच्या पतीचे लग्नातील काही सुंदर फोटो पोस्ट केलेत. दहा वर्षे जुने फोटो पोस्ट करून तिने तिच्या जुन्या आठवणींना पुन्हा एकदा उजाळा दिला आहे.

# जॉन अभिनेता नसता तर मेकॅनिक असता



अभिषेक बच्चन आणि जॉन अब्राहमची मैत्री कोणापासूनही लपलेली नाही. अभिषेकने जॉनबद्दल बोलताना, तो अभिनेता नसून मेकॅनिक व्हायला हवा होता, असे म्हटले आहे. त्याला बाइक्सची खूप आवड आहे. बाईक चालवण्याबरोबरच तो त्यांना असेंबलही करतो. त्याला बाईकशी छेडछाड करायला आवडते. नशिबाने त्याला अभिनेता बनवले, नाहीतर तो कुठेतरी मेकॅनिक झाला असता, असे त्याने म्हटले. अभिषेकने एका जुन्या मुलाखतीत सांगितले होते की, जॉन अब्राहमनेच त्याला बाइक चालवायला शिकवले होते. आधी अभिषेक बाईक चालवताना घाबरला होता. अभिषेक आणि जॉनने धूम चित्रपटात एकत्र काम केले होते. चित्रपटाचा केंद्रबिंदू सुपर बाईकच होत्या. अभिषेक बच्चन त्याच्या आगामी 'घूमर' चित्रपटामुळे चर्चेत आहे. चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान त्याला बाइकबाबतही काही प्रश्न विचारण्यात आले. तो म्हणाला- माझा एक मित्र आहे, जॉन अब्राहम. मला वाटते की त्याला बाईक खूप आवडतात. तो आधी बाईक डिस्मेंटल करतो आणि नंतर पुन्हा असेंबल करतो. त्याला हे काम खूप आवडते. मी त्याच्याकडून बाइक्सबद्दल खूप काही शिकलो आहे.

# सायलीने गायलं गाणं!



‘ठरलं तर मग’ मालिकेत सध्या सुभेदार कुटुंबीयांनी अर्जुन आणि प्रियाच्या लग्नासाठी जोरदार तयारी सुरू केली आहे. पूर्णा आजीला दिलेल्या वचनामुळे अर्जुन मनाविरुद्ध हे लग्न करणार असतो. पण, सायलीने मात्र काही केल्या ‘मी माझ्याच नवऱ्याशी लग्न करेन’ असा निश्चय मालिकेत केलेला आहे. यासाठी ती चैतन्य आणि कुसुम या दोघांना हाताशी घेऊन विविध प्रयत्न करताना दिसत आहे. आता सायली-अर्जुनचं लग्न लावण्यात ऐनवेळी कोण पुढाकार घेणार या गोष्टी मालिकेच्या आगामी भागात स्पष्ट होतील. पण, त्याआधी एका रोमँटिक प्रोमोने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे.सायली आणि अर्जुन यांच्यासह या आठवड्यात संपूर्ण ‘ठरलं तर मग’ मालिकेची टीम सिद्धार्थ जाधवचा शो ‘आता होऊ दे धिंगाणा ३’मध्ये सहभागी होणार आहे. या शोमध्ये येत्या भागात प्रेमाचा आठवडा साजरा करण्यात येणार आहे. याची पहिली झलक नुकतीच समोर आली आहे. प्रोमोच्या सुरुवातीला अर्जुन सुंदर बासरी वाजवत असल्याचं पाहायला मिळतं. यानंतर सायली आपल्या मनातील भावना सर्वांसमोर व्यक्त करते.अर्जुन या शोमध्ये पहिल्यांदाच बासरी वाजवणार आहे. त्याच्या बासरीचा सुमधूर आवाज ऐकून सगळेच तृप्त होतात. यानंतर सायली म्हणते, “गळ्यात घालून प्रेमाचा हार यावेळी तरी करशील का साता जन्मीच्या सोबतीचा करार” याचा अर्थ आता सायली

# ‘मला हेच करायचे आहे’

फिल्मफेअर पुरस्कार सोहळ्यात अभिनेत्री नुसरत भरुचाने परिधान केलेला गाऊन सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरला. काहींनी तिच्या या बोल्ड लूकची स्तुती केली तर अनेकांनी कपड्यांच्या स्टाइलवरून टीका केली. ट्रोलिंगला न जुमानता मला जसं वागायचं आहे तसंच मी वागेन असं बेधडक उत्तर नुसरत टीकाकारांना दिलं आहे. ‘टाइम्स ऑफ इंडिया’ला दिलेल्या मुलाखतीत नुसरतने ट्रोलिंगवर प्रतिक्रिया दिली आहे. “सध्याची सोशल मीडियावरची परिस्थिती अत्यंत गुंतागुंतीची आहे. त्यावरील गोष्टींवर आपलं काहीच नियंत्रण नाही. अनेकजण आपली आवड, नावड त्यावर स्पष्टपणे व्यक्त करतात. ज्यांना एखादी गोष्ट नाही आवडली, त्यांना ते स्पष्टपणे बोलण्याचा अधिकार नक्कीच आहे आणि मी प्रत्येकाचा मताचा आदर करते. पण मी ज्याप्रकारचे कपडे परिधान करते, ते एकप्रकारे माझं मतंच आहे की मला हेच करायचंय आणि मी अशीच आहे. माझ्या मताचाही लोकांनी आदर करावा”, अशा सडेतोड शब्दांत तिने ट्रोलर्सना सुनावलं. त्याचसोबत ट्रोलिंगचे कमेंट्स वाचत नसल्याचंही तिने सांगितलं. मला जे करायचं आहे ते मी करते, पण ते तुम्हाला आवडलंच पाहिजे असं नाही. तुमची आवड किंवा नावड हा पूर्णपणे तुमचा वैयक्तिक मत आहे, असं ती पुढे म्हणाली.नुसरतने फिल्मफेअर पुरस्कार सोहळ्यात ‘हाय स्लीट गाऊन’ परिधान केला होता. या गाऊनचा कट फार वरपर्यंत असल्याने त्यावरून नेटकऱ्यांनी नुसरतला ट्रोल केलं. ‘आज कालचे फॅशन डिझायनर कुठे कात्री लावतील सांगता येत नाही,’ असं एकाने लिहिलं तर दुसऱ्या एक फॉलोअरने, ‘अरे आपल्या देशात किती गरिबी आली आहे,’ अशी कमेंट केली होती.नुकत्याच पार पडलेल्या फिल्मफेअर पुरस्कार सोहळ्यात अभिनेत्री नुसरत भरुचाने परिधान केलेला गाऊन



# आपल्याला मुद्दाम चुकीचं का दाखवलं गेलं?



‘बिग बॉस मराठी’च्या पाचव्या पर्वातून घराघरात पोहोचलेली कोकण कन्या अंकिता प्रभू वालावलकर सोशल मीडियावर खूप सक्रिय असते. नेहमी आपल्या व्यावसायिक आणि वैयक्तिक आयुष्याबाबत पोस्ट करत असते. तसंच आजूबाजूच्या घडामोडींवर परखड भाष्य करत असते. लवकरच अंकिता बोहल्यावर चढणार आहे. त्यामुळे सध्या ती जोरदार लग्नाची तयारी करताना दिसत असून अनेकांना निमंत्रण देताना पाहायला मिळत आहे. काही दिवसांपूर्वी अंकिताने मनसे अध्यक्ष राज ठाकरेंना लग्नाचं निमंत्रण दिलं. यासाठी अंकिता होणारा पती कुणाल भगतसह राज ठाकरेंच्या निवासस्थानी ‘शिवतीर्था’वर गेली होती. त्यानंतर स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी ती अक्कलकोटला गेली होती. याचे नुकतेच तिने फोटो शेअर केले आहेत.अंकिता वालावलकरने अक्कलकोटचे फोटो शेअर करत एक सुंदर पोस्ट लिहिली आहे. तिच्या या पोस्टने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे. तिने लिहिलं, “काल स्वामींचं दर्शन घेऊन आलो... मनात खूप गोष्टी होत्या...सतत वाटायचं की खोटं वागणाऱ्यांबरोबर चांगलं का होतं? आपण खरं वागून चुकीचे का वाटतो? आपल्याला मुद्दाम चुकीचं का दाखवलं गेलं? पण अक्कलकोट हे एक अस स्थान आहे जिथे सगळ्या प्रश्नांची उत्तरं मिळतात...एक कायम लक्षात ठेवा ‘कर्माच्या हिशोबात उशीर होतो, चूक होतं नाही, बाकी तो बघता, तेचो लक्ष आसा’ कुणाल तू माझ्या कर्माचं एक फळ.”अंकिता भगतच्या या पोस्टवर तिच्या बऱ्याच चाहत्यांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत. पण एका नेटकऱ्याने खोचक प्रतिक्रिया दिली आहे. ज्यावर अंकिताने त्याला चांगलंच सुनावलं. तो नेटकरी म्हणाला की, तुला तशी पण गरजचं होती ‘अक्कल’कोटला जायची. यावर अंकिता प्रत्युत्तर देत म्हणाली, “तुमच्यातल्या नकारात्मकतेला स्वामी सकारात्मकतेने बदलून तुमच्या कुटुंबाचं भलं करू देत. श्री स्वामी समर्थ.”“बिग बॉस मराठी’च्या पाचव्या पर्वातून घराघरात पोहोचलेली कोकण कन्या अंकिता प्रभू वालावलकर सोशल मीडियावर खूप सक्रिय असते. नेहमी आपल्या व्यावसायिक आणि वैयक्तिक आयुष्याबाबत पोस्ट करत असते. तसंच आजूबाजूच्या घडामोडींवर परखड भाष्य करत असते. लवकरच अंकिता बोहल्यावर चढणार आहे.

**जर्सीमध्ये बदल**

## संसदेत मंजूर झालं नवं विधेयक; BCCIचे सचिव काय म्हणाले?

# टीम इंडियाच्या जर्सीमध्ये मोठे बदल!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आशिया चषक २०२५ साठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. आशिया चषक येत्या ९ सप्टेंबरपासून टी-२० फॉरमॅटमध्ये खेळवला जाणार आहे. गतविजेत्या भारतीय संघासह ८ संघ या स्पर्धेत सहभागी होणार असून युएईमध्ये ही स्पर्धा होणार आहे. यादरम्यान भारतीय संघाच्या जर्सीमध्ये मोठा फरक दिसणार आहे.**

### भारत -पाकिस्तान एकाच गटात




आशिया चषकामध्ये टीम इंडिया स्पॉन्सरच्या लोगोविना जर्सी घालणार असल्याचं म्हटलं जात आहे. आशिया चषकासाठीच्या भारताच्या जर्सीवर आशिया चषक २०२५ चा लोगो, भारताचं नाव आणि बीसीसीआयचा लोगो असणार आहेच. पण नेहमीप्रमाणे ड्रीम ११ मात्र दिसणार नाहीये. स्पॉन्सरशिवाय भारतीय जर्सी असण्यामागचं कारण म्हणजे लोकसभा आणि राज्यसभेत 'द प्रमोशन अँड रेग्युलेशन ऑफ ऑनलाइन गेमिंग बिल' मंजूर करण्यात आलं आहे. या नव्या कायद्यानुसार DREAM11सह सर्व प्रकारचे ऑनलाइन फँटसी स्पोर्ट्स आणि गेमिंग प्लॅटफॉर्म्सवर बंदी घालण्यात आली आहे.जुलै २०२३ पासून DREAM11 टीम इंडियाचे मुख्य प्रायोजक आहेत. प्रारंभीच्या करारानुसार या ऑनलाइन फँटसी स्पोर्ट्स प्लॅटफॉर्मला तीन वर्षांसाठी प्रायोजकत्व हक्क देण्यात आले होते. BCCIने अजूनही DREAM11 बरोबरच्या भविष्यातील कराराबाबत अधिकृत घोषणा केलेली नाही. मात्र, बोर्डाचे सचिव देवजीत सैकिया यांनी स्पष्ट केलं आहे की BCCI देशाच्या नियमांचे पालन करेल."जर परवानगी नसेल, तर आम्ही काहीही करणार नाही. BCCI केंद्र सरकारने ठरवलेल्या प्रत्येक धोरणाचे पालन करेल,"असे सैकिया यांनी शुक्रवारी वृत्तसंस्था एएफपीशी बोलताना सांगितले. शुक्रवारी ड्रीम 11 ने देखील अधिकृत निवेदन जारी करून स्पष्ट केलं की, "कॅश गेम्स आणि कॉन्टेस्ट्स बंद करण्यात आले आहेत." भारतीय संसदेत हे विधेयक मंजूर झाल्यानंतर त्यांनी जाहीर केलं.ऑनलाईन पैशांचे खेळ आणि सट्टेबाजीवर बंदी घालणाऱ्या या विधेयकानुसार, आता अशा खेळांच्या जाहिराती आणि आर्थिक सहाय्य करणाऱ्यांना गुन्हेगार ठरवलं आहे. दोषींना जास्तीत जास्त पाच वर्षांपर्यंत तुरुंगवास होऊ शकतो. "स्पोर्टस्टारच्या अहवालानुसार, सरकारी आकडेवारीतून दिसते की फॅन्टसी स्पोर्ट्स प्लॅटफॉर्म्स दरवर्षी तब्बल ४५ कोटी लोकांकडून अंदाजे २.३ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतकी रक्कम घेत होते. आशिया चषकामध्ये टीम इंडिया स्पॉन्सरच्या लोगोविना जर्सी घालणार असल्याचं म्हटलं जात आहे. आशिया चषकासाठीच्या

### कॅश गेम्स आणि कॉन्टेस्ट्स बंद

"स्पोर्टस्टारच्या अहवालानुसार, सरकारी आकडेवारीतून दिसते की फॅन्टसी स्पोर्ट्स प्लॅटफॉर्म्स दरवर्षी तब्बल ४५ कोटी लोकांकडून अंदाजे २.३ अब्ज अमेरिकन डॉलर्स इतकी रक्कम घेत होते.आशिया चषक २०२५ साठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. आशिया चषक येत्या ९ सप्टेंबरपासून टी-२० फॉरमॅटमध्ये खेळवला जाणार आहे.

भारताच्या जर्सीवर आशिया चषक २०२५ चा लोगो, भारताचं नाव आणि बीसीसीआयचा लोगो असणार आहेच. पण नेहमीप्रमाणे ड्रीम ११ मात्र दिसणार नाहीये. स्पॉन्सरशिवाय भारतीय जर्सी असण्यामागचं कारण म्हणजे लोकसभा आणि राज्यसभेत 'द प्रमोशन अँड रेग्युलेशन ऑफ ऑनलाइन गेमिंग बिल' मंजूर करण्यात आलं आहे. या नव्या कायद्यानुसार DREAM11सह सर्व प्रकारचे ऑनलाइन फँटसी स्पोर्ट्स आणि गेमिंग प्लॅटफॉर्म्सवर बंदी घालण्यात आली आहे.जुलै २०२३ पासून DREAM11 टीम इंडियाचे मुख्य प्रायोजक आहेत. प्रारंभीच्या करारानुसार या ऑनलाइन फँटसी स्पोर्ट्स प्लॅटफॉर्मला तीन वर्षांसाठी प्रायोजकत्व हक्क देण्यात आले होते. BCCIने अजूनही DREAM11 बरोबरच्या भविष्यातील कराराबाबत अधिकृत घोषणा केलेली नाही. मात्र, बोर्डाचे सचिव देवजीत सैकिया यांनी स्पष्ट केलं आहे की BCCI देशाच्या नियमांचे पालन करेल."जर परवानगी नसेल, तर आम्ही काहीही करणार नाही. BCCI केंद्र सरकारने ठरवलेल्या प्रत्येक धोरणाचे पालन करेल,"असे सैकिया यांनी शुक्रवारी वृत्तसंस्था एएफपीशी बोलताना सांगितले. शुक्रवारी ड्रीम 11 ने देखील अधिकृत निवेदन जारी करून स्पष्ट केलं की, "कॅश गेम्स आणि कॉन्टेस्ट्स बंद करण्यात आले आहेत." भारतीय संसदेत हे विधेयक मंजूर झाल्यानंतर त्यांनी जाहीर केलं.ऑनलाईन पैशांचे खेळ आणि सट्टेबाजीवर बंदी घालणाऱ्या या विधेयकानुसार, आता अशा खेळांच्या जाहिराती आणि आर्थिक सहाय्य करणाऱ्यांना गुन्हेगार ठरवलं आहे. दोषींना जास्तीत जास्त पाच वर्षांपर्यंत तुरुंगवास होऊ शकतो.

# ऑस्ट्रेलियाचा घरच्या मैदानावर पराभव

## आफ्रिकेने बदला घेत जिंकली मालिका; एनगिडीने घेतले 5 बळी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दक्षिण आफ्रिकेने वर्ल्ड चॅम्पियन ऑस्ट्रेलिया संघाचा घरच्या मैदानावर पराभूत करत वनडे मालिका जिंकली आहे. ऑस्ट्रेलियाला आफ्रिकेविरुद्ध सलग दुसरा वनडे सामना गमावला. तीन सामन्यांच्या वनडे मालिकेतील दोन सामने जिंकत आफ्रिकेने मालिका आपल्या नावे केली आहे. दक्षिण आफ्रिकेने ऑस्ट्रेलियाला ऑल आऊट करत तब्बल ८४ धावांनी दणदणीत विजय मिळवला.**



दक्षिण आफ्रिकेचा संघ प्रथम फलंदाजी करताना ४९ षटकांत २७७ धावांवर सर्वबाद झाला होता. आफ्रिकेकडून मॅथ्यू ब्रिट्झकेने ८८ धावांची मोठी खेळी करत वर्ल्ड रेकॉर्डही केला होता. तर ट्रिस्टन स्टब्सने ७४ धावांची खेळी केली. ऑस्ट्रेलियाकडून बार्टलेट, नॅथन एलिस आणि लबुशेन यांनी प्रत्येकी २-२ विकेट घेतल्या, तर एडम झाम्पाने सर्वाधिक ३ विकेट घेतल्या.आफ्रिकेने दिलेल्या २७७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाचा संघ ३७.४ षटकांत १९३ धावांवर सर्वबाद झाला. कॅमेरून ग्रीन ३५ धावांची खेळी केली. तर जोश इंग्लिस ७४ चेंडूत १० चौकार आणि २ षटकारांसह ८७ धावांची मोठी खेळी केली. एनगिडीने ५ विकेट्स घेत संघाच्या फलंदाजीला सुरुंग लावला आणि आफ्रिकेच्या विजयाचा मार्ग सुकर केला.दक्षिण आफ्रिकेकडून लुंगी एनगिडीने ८.४ षटकांत ४२ धावा देत विकेट्स घेतल्या. याशिवाय नांद्रे बर्गर, मुथुस्वामी यांनी प्रत्येकी २ तर वियान मुल्डरने १ विकेट घेतली. कर्णधार पॅट कमिन्स, मिचेल स्टार्क, स्टीव्ह स्मिथ आणि ग्लेन मॅक्सवेल यांसारख्या महान खेळाडूंशिवाय दक्षिण आफ्रिकेविरुद्ध एकदिवसीय मालिका खेळणाऱ्या ऑस्ट्रेलियाला एकदिवसीय मालिकेत सलग दुसऱ्यांदा पराभव पत्करावा लागला.

### गोलंदाजांना या मालिकेतून विश्रांती

काही दिवसांपूर्वीच ऑस्ट्रेलियाने दक्षिण आफ्रिकेला एका रोमांचक टी-२० मालिकेत २-१ ने हरवले होते, परंतु एकदिवसीय मालिकेतील आव्हान अधिक कठीण होतं. आफ्रिकेने टी-२० मालिकेचा बदला घेत वनडे मालिका आपल्या नावे केली.प्रथम, कर्णधार पॅट कमिन्स आणि स्टार्क सारख्या अनुभवी गोलंदाजांना या मालिकेतून विश्रांती देण्यात आली.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
। शनिवार ।
। दि. 23 ऑगस्ट 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## शिक्षण विश्व: : प्राचीन भारतीय गणिताची अद्भुत शक्ती" कार्यशाळा

# विद्यार्थ्यांनी गिरविले प्राचीन गणित पद्धतीचे धडे!

## एमआयटी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात वैदिक गणितावर कार्यशाळा

। आळंदी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**एमआयटी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आळंदी येथे 'इन्फिनिटी : द मॅथ्स क्लब' व गणित विभागाच्या संयुक्त विद्यमाने वैदिक गणित : प्राचीन भारतीय गणिताची अद्भुत शक्ती" या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली.**



या कार्यशाळेस सेंट मिराज कॉलेज फॉर गर्ल्स, पुणे येथील सहाय्यक प्राध्यापक डॉ. दीपा कृष्णमूर्ती या प्रमुख वक्ता म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी वैदिक गणितातील विविध सूत्रे, त्यांचा उपयोग आणि आधुनिक गणितीय समस्यांवरील प्रभावी उपाय विद्यार्थ्यांपुढे सादर केला.

कार्यशाळेचे प्रमुख उद्दिष्ट वैदिक गणितातील पारंपरिक भारतीय पद्धतींचा अभ्यास करून त्या आधुनिक काळातील गणना सुलभ करण्यासाठी कशा उपयुक्त ठरतात हे विद्यार्थ्यांना समजावून सांगणे होते. पारंपरिक सूत्रांद्वारे गणनेचा वेग, अचूकता आणि मानसिक क्षमता कशी वाढवता येते, याचे प्रात्यक्षिकातून मार्गदर्शन करण्यात आले. यासोबतच, विद्यार्थ्यांना भारतीय गणिताच्या समृद्ध वारशाची ओळख करून देण्याचा मुख्य हेतू होता.

या कार्यशाळेत महाविद्यालयाच्या विविध शाखांतील १०१ विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. सहभागींनी वैदिक गणितातील तंत्रज्ञानाच्या वापरातून गणित अधिक सोपं व रुचकर कसं होऊ शकतं याचा अनुभव घेतला.

कार्यशाळेचे आयोजन इन्फिनिटी क्लबचे समन्वयक प्रा. त्रुप्ती निगडकर , गणित विभागप्रमुख प्रा. प्रदीप पानसरे, सहयोगी अधिष्ठाता, विद्यार्थी कल्याण. डॉ. सुनील महाजन , संचालक डॉ. बी. बी. वाफरे आणि डॉ. अक्षदा कुलकर्णी, उपसंचालक डॉ. मानसी ॲटिट्यूड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेला दिलेली सकारात्मक प्रतिक्रिया आणि उत्स्फूर्त सहभाग पाहता, भविष्यात अशा उपक्रमांची मालिका राबवण्याचा मानस आयोजकांनी व्यक्त केला.

---

# वास्तु विशारदांमध्ये सर्वसमावेशक विकासाचे व्हिजन असावे!

## राजीव भावसार: एस. बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अँड डिझाईन मध्ये विद्यार्थी गुणगौरव सोहळा

। पिंपरी चिंचवड। प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: जलदिंडी च्या माध्यमातून पवना नदीचा उगम शोधताना लक्षात आले की, या नदीत शहरी भागात सांडपाणी सोडले गेल्याने ती प्रदूषित झाली आहे. तसेच वाढत्या शहरीकरणामुळे नदी प्रदूषणासारख्या अनेक समस्यांमुळे नागरिक त्रस्त झालेले आहेत. त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी आता वास्तू विशारद यांनी सर्व बाजूंनी विचार करून, सर्व समावेशक विकास प्रकल्प सादर करावे अशी अपेक्षा जलदिंडी या नदी सुधार क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थेचे संचालक राजीव भावसार यांनी व्यक्त केली.**



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) च्या एस.बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अँड डिझाईन या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न झाला.

यावेळी पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, प्राचार्या डॉ. स्मिता सूर्यवंशी, प्राध्यापक, कर्मचारी, यशस्वी विद्यार्थी उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे आर्किटेक्ट प्रतिक देशमुख यांनी सांगितले की, कठोर परिश्रम आणि प्रयत्नात सातत्य ठेवले की यश आणि श्रेष्ठतेचा मार्ग सापडतो. शहरी भागात आता परवडणारी पर्यावरण पूरक घरे निर्माण करण्यात येत आहेत. यामध्ये नैसर्गिक संसाधनाचा वापर करून उच्च तंत्रज्ञान युक्त नागरी सेवा, सुविधा प्रकल्प उभारणी साठी वास्तू विशारद यांची भूमिका महत्वपूर्ण ठरणार आहे.

यावेळी अंतिम वर्षात प्रथम ऐश्वर्या गराडे, द्वितीय संयुजा पारवे व तृतीय ऐश्वर्या नायर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला. नाशिक महानगरपालिका तर्फे झालेल्या स्पर्धेत यशस्वी विद्यार्थी कृतिका कदम, इशिका नारखेडे, तन्वी खोचरे, कुणाल कुंभार, निपुण कोसरे, मृणाल जाधव, श्रुतिका वर्णेकर, अदित्री केंकारे, कादंबरी कुंभार आणि मार्गदर्शक आर्किटेक्ट नीलिमा भिडे, श्रेया कानडे, ऋतुजा माने यांचा सत्कार करण्यात आला. तसेच पीडीए आर्किटेक्ट फॉर्म तर्फे पुणे येथे झालेल्या एमसीए आंतराष्ट्रीय क्लब हाऊस स्पर्धेत यश मिळवलेले भाग्यश्री चौधरी, वेदांत गरुड, ईशा डुंबरे, हिमांशु वाघ, सिद्धी सावंत, यश नेहरकर, तिशा केला, गणेश मुदावत यांचा आणि मार्गदर्शक आर्किटेक अजय हराळे, रोशनी देशपांडे, दक्षा देशमुख यांचा देखील सत्कार करण्यात आला. आयआयटी कानपूर येथे झालेल्या कार्यशाळेत राष्ट्रीय स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी दिशा प्रधान, आदित्य बरगे या विद्यार्थ्यांचा आणि त्यांचे मार्गदर्शक प्रा. प्राची देशपांडे यांचाही सत्कार करण्यात आला.

सूत्रसंचालन प्रा. बिजल वखारिया व श्रेयसी शिंदे आणि आभार प्रा. शिल्पा पाटील यांनी मानले.

Pune District Education Association's

# Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy

Saswad, Pune - 412301

D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

Pharmacy Council of India | SPPU Affiliation | NAAC Accreditation | Maharashtra State Board of Technical Education

## Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26



### Admission Schedule for F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |

**Your Trusted Facilitation Centre!**

**FC Code 6372**

Important Note:

- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

**"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"**

**Confirm Your Application Now!**



- Visit Us for Physical Scrutiny
- PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad
- Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)
- Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549

# ‘डीबीटी’च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप!

## अतिरिक्त आयुक्तांनी शाळांना अचानक भेट देत केली शालेय साहित्याची तपासणी

। पिंपरी चिंचवड ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी आज सकाळी अचानक महापालिकेच्या चऱ्होली बु. येथील पंडित जवाहरलाल नेहरू प्राथमिक शाळेला भेट दिली. यावेळी त्यांनी बाकावर बसून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच थेट लाभ हस्तांतरण म्हणजेच डीबीटी उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या शालेय साहित्याची तपासणी केली. यंदाच्या वर्षी मिळालेले साहित्य कसे वाटते, याबाबत विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रियाही त्यांनी जाणून घेतल्या.**



> “ विद्यार्थ्यांना ‘डीबीटी’च्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या शैक्षणिक साहित्याचा दर्जा तपासणे व विद्यार्थ्यांच्या या साहित्याबाबत प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी आज चऱ्होली बु. येथील पंडित जवाहरलाल नेहरू प्राथमिक शाळेला भेट दिली होती. तसेच महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या योजनांचा त्यांना फायदा कितीपत होत आहे? भारत दर्शन सारख्या उपक्रमांची विद्यार्थ्यांना माहिती आहे का? हे जाणून घेण्याचा उद्देशही या भेटीमागे होता. आगामी काळामध्येही अशा प्रकारे अचानक शाळांना भेट देऊन तपासणी सुरू राहतील.
>
> **- प्रदीप जांभळे पाटील,**
> अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

पिंपरी चिंचवड महापालिकेने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपासाठी डीबीटी उपक्रम सुरू केला आहे. महापालिकेच्या १४६ शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचा थेट लाभ मिळावा, या उद्देशातून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमातून सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य किट मिळाले आहे का, याची तपासणी आता शिक्षण विभागाने सुरू केली आहे. त्या अनुषंगाने अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी थेट आज चऱ्होली बु. येथील शाळेला अचानक भेट देत तपासणी केली. तसेच विद्यार्थ्यांसोबत संवाद साधत त्यांच्याकडून शैक्षणिक साहित्याचा दर्जा कसा आहे, हे देखील जाणून घेतले.

चऱ्होली बु. शाळेतील जवळपास ९० टक्के विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे कीट मिळाले असल्याचे निर्देशनास आले. तर उर्वरीत विद्यार्थ्यांना अद्याप कीट का मिळाले नाही, याबाबत अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी माहिती घेतली. त्यानंतर तातडीने शैक्षणिक साहित्याचे कीट मागवून घेत विद्यार्थ्यांना वाटप केले. यावेळी सदर शैक्षणिक कीट स्वतःच्या हाताने फोडून त्यामध्ये असणाऱ्या साहित्याची तपासणी जांभळे पाटील यांनी केली. यावेळी काही विद्यार्थ्यांना गणवेश व शूज मिळाले नसल्याचे लक्षात आल्यानंतर जांभळे पाटील यांनी विद्यार्थ्यांना दोन दिवसाच्या आत गणवेश व शूज देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या शैक्षणिक साहित्याचा पुरेपूर वापर होईल, याची काळजी घेण्याच्या सूचनाही शाळेल्या शिक्षकांना दिल्या.

### शालेय पोषण आहाराची घेतली माहिती

विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहाराच्या गुणवत्तेबाबत देखील अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी माहिती घेतली. तसेच पोषण आहाराची गुणवत्ता आणि प्रमाण तपासण्यासाठी तो स्वतः खाऊन पाहिला. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या आहाराची गुणवत्ता ही उत्तमच असावी. त्याची वेळोवेळी शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक यांनी तपासणी करावी. त्यामध्ये कुठलाही हलगर्जीपणा करू नका, असे निर्देशही त्यांनी दिले.




Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17k+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13k+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org